अ.क्र. 14

| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | # उपसंचालक आरोग्य सेवा<br>(राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र),<br>नायडु रुग्णालय आवार, पुणे ४११ ००१ | |
| दुरध्वनी ०२०-२६०५९५३०, फॅक्स ०२०-२६०५८२९२, | | email : crs_d81@yahoo.com |

आरोग्य सेवा

**महत्वाचे परिपत्रक**

कक्ष ८१/ नागरी नोंदणी विभाग/ ७९२-७९५/२०१४.

दिनांक : २५/११/२०१४

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू
जिल्हापरिषद........................सर्व

२) आरोग्य अधिकारी/मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म मृत्यू
महानगरपालिका/नगरपरिषद...........सर्व (जिल्हा आरोग्य अधिकारी मार्फत)

३) गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक ...........सर्व
(जिल्हा आरोग्य अधिकारी मार्फत)

विषय : जन्म व मृत्यू अहवालात आधारकार्ड (यूआयडी) क्रमांकाचा समावेश करण्या बाबत......

संदर्भ : केंद्र सरकारचे पत्र क्र. १/१२/२०१४ - व्हीएस (सीआरएस)/३६८ दिनांक: २८/१०/२०१४.

उपरोक्त विषयांतर्गत भारत सरकारच्या संदर्भिय पत्रानूसार नागरी नोंदणी योजनेअंतर्गत नविन संगणक प्रणाली लवकरच सर्वत्र सुरु होणार असून सदर संगणक प्रणालीत प्रत्येक जन्ममृत्यूची घटना ही "आधारकार्ड क्रमांकाशी" (Unique Identification Number) जोडण्यात येणार आहे.

नमूद माहितीसाठी जन्म मृत्यू व उपजत मृत्यूच्या अहवालात अनुक्रमे नमूना क्र. १,२ व ३ मध्ये सदर माहितीचा समावेश करण्यात येत आहे.

सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांनी जन्म मृत्यूचे नमूने छपाई करताना त्यानूसार बदल करुन छपाई करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर नमून्याची हार्ड कॉपी आणि सॉफ्ट कॉपी सोबत जोडण्यात येत आहे.

पंचायत समित्यांना जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सदर नमून्यात हा बदल करुन सन २०१५ पासून नविन फॉमर्स पुरविण्यात येणार आहेत.

जन्म मृत्यू नोंदणी अहवालात झालेला बदल हा सर्व निबंधकांना त्वरित कळविण्यात यावा व त्यानूसार अहवालात माहिती भरुन घेण्यात यावी.

आपल्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या महानगरपालिका/नगरपालिका/पंचायत समिती यांना सदर पत्र ईमेल व्दारे त्वरित पाठविण्यात यावे तशी पोच या कार्यालयाला देण्यात यावी.

उपसंचालक आरोग्यसेवा (आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य,
पुणे-१.

प्रत माहितीसाठी सस्नेहः
श्री. वाय.एस. पाटील
उपसंचालक,
जनगणना संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीसाठी सादरः
मा. संचालक आरोग्य सेवा तथा
मुख्यनिबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य
मुंबई - १.